# तंत्र शिक्षण संचालनालय
# महाराष्ट्र शासन

**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**

दुरध्वनी – ०२२-३०२३३४५६,३०२३३४६४,३०२३३४२०, **फॅक्स**-०२२-३०२३३४५३

**E-mail : mtcet२०१३@dte.org.in** **सीईटीकक्ष** **Website:www.dtemaharashtra.gov.in**

**क्रमांक**:20/डीटीई/जेईई-(मेन)/2014/52.
दिनांक : 11 MAR 2014

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय, अनुदानित
तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालये,
औषध निर्माणशास्त्र महाविद्यालये.

विषय : - प्रवेश प्रक्रियेसाठी संस्थेची इमारत, अधिकारी/कर्मचारी उपलब्ध करुन देणे.

तंत्रशिक्षण संचालनालयाअंतर्गत अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी संचालनालया तर्फे किंवा इतर माध्यामातुन प्रवेश परीक्षा घेतल्या जातात. सदरील प्रवेश प्रक्रियेतील पात्र उमेदवारांना विविध अभ्यासक्रमांना प्रवेश दिला जातो. या दृष्टिने या परीक्षांचे आयोजन संचालनालय व सर्व संस्थांच्या दृष्टिने अत्यंत महत्त्वाचे असुन, सर्व परीक्षाच्या आयोजनामध्ये महाविद्यालयांचा सक्रिय सहभाग व सहकार्य असणे आवश्यक आहे. संचालनालयाच्या असे निदर्शनास आलेले आहे कि बऱ्याच संस्थांनी प्रवेश परिक्षांसाठी महाविद्यालयाची इमारत व अधिकारी / कर्मचारी उपलब्ध नसल्याचे संबंधित यंत्रणांना कळविलेले आहे. अशा प्रकारे साप्ताहीक सुटीच्या दिवशी घेण्यात येणा-या परीक्षेसाठी काही क्षुल्लक कारणास्तव (संस्थेच्या प्रात्यक्षिक परीक्षा, इतर परिक्षा, बैठक व्यवस्था केलेली असणे, संस्था शहारापासुन दूर असणे, संस्थेला सुटी असणे इ.) इमारत उपलब्ध करुन न देणे अत्यंत चुकीचे आहे. अशा प्रकारची माहिती कळविल्यामुळे संचालनालयास इतर महाविद्यालयांमध्ये शेवटच्या क्षणी व्यवस्था करावी लागते व याचा सर्वांना नाहक त्रास होतो. बऱ्याचवेळा परिक्षार्थीना दुसऱ्या शहरामध्ये परीक्षेसाठी जावे लागते व याचा त्रास पालक व विद्यार्थ्यांना होतो.

आपणांस या पत्राव्दारे कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालयाव्दारे / च्या वतीने आयोजीत करण्यात येणाऱ्या सर्व परीक्षांना आपले महाविद्यालय व संस्थेचे अधिकारी / कर्मचारी प्राधान्याने उपलब्ध करुन देण्यात यावेत. जेणे करुन संबंधीत प्रवेश परीक्षा हया नियोजित वेळेत व याशस्वीपणे पार पाडणे शक्य होईल.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई

सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
क्र. तंशिसं/प्राकाना/जेईई–(मेन)/ /२०१४/ 963
दिनांक : 25 MAR 2014 /२०१४

प्रति,
संचालक/प्राचार्य,
सर्व शासकीय, अनुदानित तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी महाविद्यालये,
औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये नागपूर विभाग, नागपूर.

यांना कळविण्यांत येते की, उपरोक्त पत्रात नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर